# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
## प्रथम खबर अहवाल
## (कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** आनंदनगर **Year (वर्ष):** 2024
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0177
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**28/05/2024 18:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 28/05/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/05/2024
**Time From (वेळेपासून):** 12:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/05/2024 **Time (वेळ):** 18:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 032
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/05/2024 18:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जिल्हा कोषागार कार्यालय, धाराशिव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बिभिषण निवत्ती सोनवणे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1965

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा बायपास रोड, गस पंपा जवळ, धाराशिव ताजिधाराशिव ,आनंदनगर, उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा अपसिंगा ता तुळजापूर,जि धाराशिव,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8600608338

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनंता सखाराम कानडे | | | 1. रा सरमकुंडी, तावाशी,,जि धाराशिव ,आनंदनगर, उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रुपये दराच्या 6चलनी नोटा | 3,000.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी बिभिषण निवृत्ती सोनवणे, वय 59 वर्ष, व्यवसाय - सेवानिवृत्त, रा. अपसिंगा ता. तुळजापूर जि धाराशिव सध्या रा. बायपास रोड, गॅस पंपा जवळ, धाराशिव ता.जि.धाराशिव मोबाईल नंबर 8600608338, 9404673383 मी आज रोजी समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 31.05.2023 रोजी पोलीस खात्यातुन वयोमानानुसार पोलीस हवालदार पदावरुन सेवानिवृत्त झालो आहे. मी सेवानिवृत्त झाले नंतर माझे सेवानिवृत्ती वेतन मंजुरी प्रस्ताव व पेन्शन विक्रीचे बिल पोलीस अधीक्षक, कार्यालय धाराशिव येथुन एप्रील/2024 मध्ये कोषागार कार्यालय, धाराशिव येथे पाठविण्यात आले आहे. त्यानंतर सदरचे बिल कोषागार कार्यालयातुन पोलीस अधीक्षक कार्यालय, धाराशिव येथे त्रुटीवर पाठविण्यात आले. त्यानंतर पोलीस अधीक्षक कार्यालय, धाराशिव यांनी त्रुटीची पुर्तता करुन माझे सेवानिवृत्ती वेतन मंजुरी प्रस्ताव व पेन्शन विक्रीचे बिल कोषागार कार्यालय, धाराशिव येथे पाठविले.

मी दिनांक 24.05.2024 रोजी कोषागार कार्यालय, धाराशिव येथे गेलो व तेथील निवृत्ती वेतन टेबलचे लिपीक कानडे यांना समक्ष भेटलो, त्यावेळी कानडे यांनी माझे पेन्शन विक्री बील व सेवानिवृत्त वेतन मंजुरी बिलाची ओळख पडताळणी करुन त्याचे बिल तयार करुन ते ऑडिट टेबलला पाठविण्यासाठी माझेकडे 3,000/- रु. लाचेची मागणी केली.म्हणुन मी आज दि. 28.05.2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे समक्ष येवुन कानडे साहेब यांचेवर कायदेशीर कारवाई करावी म्हणुन तक्रार दिली.

त्यानंतर पोनि कदम यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध केले. मी दिलेल्या तक्रारीवरुन आज दि. 28.05.2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री. कदम साहेब यांनी जिल्हा कोषागार कार्यालय, धाराशिव येथील लिपीक कानडे हे माझेकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत मला व पंच क्र. 1 वारे यांना योग्य त्या सुचना देऊन जिल्हा कोषागार कार्यालय,धाराशिव येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.त्यानंतर लाचमागणी पडताळणी पुर्व कार्यवाही केली. त्यानंतर 11.52 वा.चे सुमारास माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिल्यानंतर मी व पंच क्रं.01 असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय धाराशिव येथुन माझेकडील स्कुटीने जिल्हा कोषागार कार्यालय, धाराशिव येथे जाऊन लिपीक कानडे यांना भेटलो. त्यावेळी लिपीक कानडे यांनी जिल्हा कोषागार कार्यालय, धाराशिव येथे माझे पेन्शन विक्री बील व सेवानिवृत्त वेतन मंजुरी बिलाची ओळख पडताळणी करुन त्याचे बिल तयार करुन ते ऑडिट टेबलला पाठविण्यासाठी पंचासमक्ष माझेकडे 3,000/- रुपये लाचेची मागणी केली व सदर रक्कम घेऊन येण्यास सांगीतले.

त्यांनतर मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाण लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, धाराशिव येथे पंचासह येऊन पोनि कदम यांना घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर पोनि कदम यांनी व्हाईस रेकार्डरमध्ये झालेले संभाषण ऐकले असता, लिपीक कानडे यांनी माझे पेन्शन विक्री बील व सेवानिवृत्त वेतन मंजुरी बिलाची ओळख पडताळणी करुन त्याचे बिल तयार करुन ते ऑडिट टेबलला पाठविण्यासाठी पंचासमक्ष माझेकडे 3,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन पोनि कदम यांनी सापळा आजमावणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पो.नि.कदम साहेब यांनी मला व पंचाना अँथ्रासिन पावडरचा आणि अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग समजावुन सांगुन, त्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सापळा पुर्व कारवाई करण्यात आली. त्यानंतर मी सापळा कारवाई साठी हजर केलेल्या नोटांना पोलीस अंमलदार पाटील यांनी अँथ्रासिन पावडर लावुन, सदरच्या नोटा माझ्या पँटच्या उजव्या खिशात ठेवल्या. पोनि कदम साहेब यांनी मला लिपीक कानडे यांनी स्वत: किंवा इतरामार्फत लाच रक्कम स्विकारल्यानंतरचा करावयाचा इशारा नेमुन दिला. त्यानंतर पो.अं.आचार्य यांनी माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिले. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना लिपीक कानडे यांची भेट घेण्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालय, धाराशिव येथे स्कुटीवरुन रवाना करुन, आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र. 2 हे त्यांचेकडील मोटारसायकलवर आले. मी व पंच क्रमांक 1 असे माझेकडील स्कुटीवरुन जिल्हा कोषागार कार्यालय, धाराशिव येथे गेलो. कार्यालयाच्या परिसरात



Scanned with CamScanner

स्कुटी लावुन मी लिपीक कानडे यांचे कार्यालयात गेलो असता, त्यावेळी लिपीक कानडे यांनी मला कार्यालयाच्या बाहेर जाऊन थांबण्यास सांगीतले. त्यानंतर मी व पंच क्र.1असे कार्यालयाचे बाहेरील उजव्या बाजुच्या परिसरात जाऊन थांबलो. त्यानंतर थोडयाच वेळात लिपीक कानडे हे कार्यालयाचे बाहेर मी थांबलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी लिपीक कानडे यांनी मला माझे बिल लवकर काढतो म्हणुन माझेकडे पैसे देण्याबाबत हाताने ईशारा केला. त्यावेळी मी माझे पँटच्या उजव्या बाजुच्या समोरील खिश्यातील अँथ्रासिन पावडरयुक्त 3,000/- रु लाच रक्कम उजव्या हाताने काढुन लिपीक कानडे यांचेसमोर धरली असता, ती रक्कम लिपीक कानडे यांनी उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे अंगावरील पँटच्या उजव्या बाजुच्या समोरील खिश्यात ठेवली. त्यानंतर मी मला लाच रक्कम स्विकारल्या नंतरचा नेमुन दिलेला पँटच्या डाव्या बाजुच्या खिश्यातीलरुमाल डाव्या हाताने काढुन तोंड पुसुन तो रुमाल डाव्या हातात पकडुन 12.50 वाजताचे सुमारास लाच स्विकृतीचा इशारा केला. इशारा प्राप्त होताच पो.नि.कदम साहेब, पंच क्र.2 व सापळा पथक हे तात्काळ घटनास्थळी हजर आले. त्यावेळी पोअं/ आचार्य यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. तेव्हा पो.नि.कदम साहेब यांनी पंच क्र.1 यांना विचारणा केली की, तक्रारदार यांना कोणी लाचेची मागणी करुन, ती लाच रक्कम कोणी स्विकारली. तेव्हा पंच क्र. 1 यांनी सांगितले की, लिपीक कानडे यांचेकडे हाताने इशारा करुन, त्यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्वत: स्विकारली आहे. त्यानंतर पो.नि.कदम साहेब यांनी लिपीक कानडे यांना ताब्यात घेवुन स्वत:चा परिचय देवुन त्यांचा नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव अनंता सखाराम कानडे, वय - 29 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद- लेखालिपीक, निवृत्ती वेतन शाखा, जिल्हा कोषागार कार्यालय, धाराशिव. रा. सरमकुंडी, ता.वाशी, जि. धाराशिव सध्या रा. बँक कॉलनी, धाराशिव असे सांगितले. त्यानंतर तेथे पोनि कदम व सापळा पथकाने लिपीक कानडे यांना ताब्यात घेऊन जिल्हा कोषागार कार्यालय, धाराशिव येथे घेऊन गेले व तेथे पंचासमक्ष यशस्वी सापळा कारवाई नंतरची पुढील कायदेशीर कारवाई केली.

तरी जिल्हा कोषागार कार्यालय, धाराशिव येथील अनंता सखाराम कानडे, लेखालिपीक, निवृत्ती वेतन शाखा, जिल्हा कोषागार कार्यालय, धाराशिव यांनी माझे पेन्शन विक्री बील व सेवानिवृत्त वेतन बिलाची ओळख पडताळणी करुन ते बिल ऑडिट टेबलला पाठविण्यासाठी आज दिनांक 28.05.2024 रोजी पंचासमक्ष 3,000/-रु. लाचेची मागणी केली व अँथ्रासिन पावडरयुक्त लाच रक्कम 3,000/- रुपये सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन माझी श्री.अनंता सखाराम कानडे, वय - 29 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद- लेखालिपीक, निवृत्ती वेतन शाखा, जिल्हा कोषागार कार्यालय, धाराशिव. रा. सरमकुंडी, ता.वाशी, जि. धाराशिव यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितले प्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत करुन, त्यांची प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली, ती मी वाचुन पाहिली माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

HEMANT POPATRAO KADAM(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे
आनंदनगर,धाराशिव

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** HEMANT POPATRAO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**



Scanned with CamScanner